लोकमत

# आंतरविभागीय फुटबॉलमध्ये कमला कॉलेज चमकले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वारणा नगर येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धेत कमला कॉलेजने वाय. सी. वारणा महाविद्यालयाचा पराभव करीत तिसरा क्रमांक पटकावला.

स्पर्धेत शिवराज कॉलेज, गडहिंग्लजचा ५-३ असा पराभव करीत उपांत्य फेरी गाठली. उपांत्य फेरीत न्यू कॉलेजकडून पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या अटीतटीच्या लढतीत वाय.सी. वारणा महाविद्यालयावर १-० अशी मात केली. या विजयी संघामध्ये तेजस्विनी पाटील (कर्णधार), निकिता जाधव (गोलरक्षक), यशश्री देशमुख, ज्ञानेश्वरी ठोंबळ, स्वाती राजपूत, सृष्टी शेंडे त्याचबरोबर श्वेता जाधव यांनी चमकदार कामगिरी केली.

या खेळाडूंना ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांचे प्रोत्साहन, तर रघुनाथ पाटील, शारीरिक शिक्षणच्या संचालिका ज्योती गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी

# युवा महोत्सवाची आजपासून धूम!

## जिल्हास्तरीयला आज साताऱ्यात प्रारंभ; दोन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग : दोन वर्षांनंतर ऑफलाईन महोत्सव




**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाचा संसर्ग कमी झाल्यावर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २० ते २९ डिसेंबर या कालावधीत जिल्हा व मध्यवर्ती युवा महोत्सव घेण्यात येणार आहे. दोन वर्षांनंतर महोत्सव ऑफलाईन पद्धतीने होणार आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत महोत्सवाची धूम असणार आहे.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाने युवा महोत्सवाचे नियोजन केले आहे. जिल्हास्तरीय महोत्सवाची सुरुवात २० डिसेंबरपासून सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेज येथे होणार आहे. दि. २२ रोजी सांगलीच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात तर दि. २४ रोजी कोल्हापुरात न्यू कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव रंगणार आहे. मध्यवर्ती युवा महोत्सव संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय महागाव (ता. गडहिंग्लज) येथे २७ ते २९ डिसेंबर दरम्यान होणार आहे. जिल्हास्तरीय महोत्सवात १४ तर मध्यवर्तीमध्ये ३२ कलाप्रकारांचा समावेश आहे. यात सुमारे दोन हजार विद्यार्थी सहभागी होणार आहेत, अशी माहिती शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी दिली.

### दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर युवा महोत्सवासाठी कडक नियमावली जारी करण्यात आली आहे. त्यानुसार कोरोना लसीचे दोन डोस घेतलेले किंवा ७२ तास अगोदर 'आरटीपीसीआर' चाचणी केलेल्या विद्यार्थी, कलाकारांना महोत्सवात सहभागी होता येणार आहे.